# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 24 July 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – २४ जुलै २०२६ सायंकाळी ६.१०

****

- परीक्षा व्यवस्थेत केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकार आणि एनटीए यांनी सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश
- नीट प्रकरणी सुनावणीसाठी छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर इथं विशेष न्यायालयं निश्चित
- एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना वर्षभर सामाजिक सेवा अनिवार्यतेचा नियम राज्यशासनाकडून रद्द
- सर्व शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप वापरावं-पंढरपूरच्या कृषी मेळाव्यात मुख्यमंत्र्यांचं आवाहन

आणि

- उद्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल मंदिरांत वारकऱ्यांची मांदियाळी

****

नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणानंतर परीक्षा व्यवस्थेत केलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्था-एनटीए यांनी सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठानं आज झालेल्या सुनावणीत परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा तात्पुरत्या उपायांवर न ठेवता संस्थात्मक पातळीवर केलेल्या उपाययोजनांची माहिती देण्याची सूचना केली. तसंच, प्रस्तावित प्रशासकीय मंडळ, तज्ज्ञ समित्या, भागधारकांचे प्रतिनिधित्व आणि डिजिटल पायाभूत सुविधा, सुरक्षा, पारदर्शकता, प्रशासन आणि मनुष्यबळ

यांसह विविध क्षेत्रांतील सुधारणांच्या अंमलबजावणीचा तपशीलही सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

****

या प्रकरणी सुनावणीसाठी जलदगती न्यायालयांच्या स्थापनेलाही सुरुवात झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर इथं दोन विशेष न्यायालयं निश्चित केली आहेत. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी या खटल्यांच्या सुनावणीसाठी छत्रपती संभाजीनगर इथले अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी एस. व्ही. पवार आणि नागपूर इथले अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी गुलशन कोलते यांची नियुक्ती केली आहे.

****

केंद्र सरकार आणि कॉकरोच जनता पार्टीच्या प्रतिनिधींमध्ये आज २ तास चर्चा झाली. उद्या चर्चेची पुढची फेरी होणार आहे. आजच्या चर्चेत सीजेपीच्या प्रतिनिधीं तीन मागण्या केल्याची माहिती मंत्री जे. पी. नड्डा यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा**

****

दरम्यान, पेपरफुटी प्रकरणांमध्ये दोषींवर अधिक कठोर शिक्षा करण्याची तरतूद असलेल्या विधेयकाच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर दंडात्मक आणि कायदेशीर तरतुदी असलेले हे विधेयक पुढील आठवड्यात संसदेत सादर केले जाण्याची शक्यता असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

देशात तीन समर्पित रासायनिक उद्याने उभारण्यासाठी भारत औद्योगिक विकास रसायन योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज झालेल्या बैठकीत मंजुरी दिली. मंत्रिमंडळाने या योजनेसाठी ३ हजार ३० कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यालाही मान्यता दिली असून, २०३०-३१ पर्यंत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

****

केंद्र सरकारने दूरदर्शन मूल्यांकन धोरण २०२६ जाहीर केलं आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. या धोरणात भारतातील दूरचित्रवाणी मूल्यांकन प्रणालीच्या नियमनासाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

दरम्यान, नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून विरोधी पक्षांचा गदारोळ आजही कायम होता. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज सलग पाचव्या दिवशी बाधित झालं. कामकाज तहकूब होण्यापूर्वी राज्यसभेत केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक सुधारणा विधेयक, २०२६' सादर केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते संदोश कुमार यांनी विधेयकाला विरोध केला.
कारगिल युद्धात बलिदान देणाऱ्या भारतीय सशस्त्र दलाच्या हुतात्म्यांना लोकसभेत आदरांजली वाहण्यात आली.

****

एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना एक वर्षभर सामाजिक सेवा अनिवार्य करणारा नियम राज्यशासनाने रद्द केला आहे. सध्या या सेवेत असलेल्या विद्यार्थ्यांनाच ती पूर्ण करावी लागेल असं राज्य शासनाने यासंदर्भात जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

****

राज्यातल्या सर्व शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप वापरावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज पंढरपूर इथं कृषी प्रदर्शन आणि मेळाव्यात बोलत होते. एआय आधारित हे ॲप म्हणजे शेतकऱ्यांचा मित्र असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

यंदा पंढरपुरात आषाढी यात्रेसाठी सुमारे तीस लाखांवर भाविक आल्याचा अंदाज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. वारकऱ्यांची दर्शनरांग २१ किलोमीटरपर्यंत पोहोचल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या सर्व यात्रेकरुंच्या व्यवस्थेचाही त्यांनी आढावा मांडला. पंढरपूर कॉरीडॉरमध्ये शंभर टक्के नागरिकांचं समाधान करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

पंढरपुरात उद्या पहाटे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पांडुरंगाची सपत्निक महापूजा होणार आहे.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणच्या विठ्ठल मंदिरांत वारकऱ्यांची मांदियाळी दिसून येत आहे.

छत्रपती संभाजीनगर जवळील पंढरपूर इथल्या विठ्ठल – रुक्मिणी मंदिरात आज राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. प्रशासनातर्फे मंदिर परिसर, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता आणि दर्शन व्यवस्थेची जय्यत तयारी करण्यात आली असून गर्दीच्या पार्श्वभूमीवर मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली आहे. विविध संघटनांच्या वतीने उद्या अनेक दिंड्या मंदिर परिसरात दाखल होतात. नवी दिल्लीच्या भारतीय योग संस्थान च्या छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे छत्रपती संभाजीनगर ते वाळूज-पंढरपूर पर्यंत पायी दिंडी काढण्यात येणार आहे. सकाळी पावणेसात वाजता ही दिंडी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे यंदाचं सहावं वर्ष आहे.

****

प्रकल्प बाधीत शेतकरी आणि स्थानिकांना उभारल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये रोजगारासाठी प्राधान्य देणे हेच शासनाचे धोरण आहे. कौशल्य विकास केंद्र तयार करून प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावे, त्यासाठी टोयोटा किर्लोस्कर यांच्याशी सामंजस्य करार करावा, असे निर्देश उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर इथं ऑरिक सिटी सभागृहात उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. या बैठकीत प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली. यावेळी खासदार संदीपान भुमरे, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार विलास भुमरे यांच्यासह अनेक मान्यवर आणि विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, उद्योग मंत्री उदय सामंत यांनी यावेळी विविध उद्योजकांची बैठक घेऊन संवाद साधला. शेंद्रा, बिडकीन औद्योगिक वसाहतीत सूक्ष्म आणि लघु उद्योगांना समन्यायी आणि सुयोग्य पद्धतीने भूखंड उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश सामंत यांनी यावेळी दिले. औद्योगिक क्षेत्रात ट्रक टर्मीनस सुरु करण्यासाठी औद्योगिक संघटनांनी सहभागी घ्यावा, तसेच एक्झिबीशन सेंटरच्या कामाला गती द्यावी, असे निर्देशही सामंत यांनी दिले.

****

धाराशिव जिल्ह्यात जुलै महिना संपत आला तरीही खरिपाच्या पेरण्या अद्याप पूर्ण होऊ शकल्या नाहीत. जिल्ह्यात सध्या दहा टक्के पाणीसाठा शिल्लक असून ७५ टक्के

क्षेत्रावर खरिपाच्या पेरण्या झाल्या आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक २७६ मिलीमीटर पाऊस कळंब तालुक्यात तर सर्वात कमी १०७ मिलीमीटर पाऊस लोहारा तालुक्यात नोंदवला गेला आहे. निर्धारित पाच लाख ५० हजार ५८० हेक्टर क्षेत्रापैकी चार लाख दहा हजार २६१ हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत.

****

ग्लासगो इथं राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी, भारताच्या श्रीहरी नटराजने पुरुषांच्या ५०-मीटर बॅकस्ट्रोक प्रकाराच्या उपांत्य फेरीत धडक मारली. नटराजने 'हीट्स'मध्ये २५ मिनीटे ५२ सेकंदची वेळ नोंदवत उपांत्य फेरी गाठणाऱ्या १६ जलतरणपटूंमध्ये १४ वे स्थान मिळवले. या प्रकाराची उपांत्य फेरी आज रात्री होणार आहे. याआधी, रवी वीरा वेंकट बुडिगिना आणि अली इमाम हे पुरुषांच्या १०० मीटर फ्रीस्टाईल पॅरा-जलतरण प्रकारात अंतिम फेरीसाठी पात्र ठरले.

****

हवामान

राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा मुंबई वेधशाळेने दिला आहे. विशेषतः पुणे तसंच नाशिक जिल्ह्यात घाटमाथा परिसर, ठाणे, पालघर आणि संपूर्ण कोकण भागात पावसाचा जोर अधिक राहणार असून, नागरिकांना आणि प्रवाशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

नाशिक जिल्ह्यात होत असलेल्या पावसामुळे धरणांच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ होत आहे. नांदूर मधमेश्वर प्रकल्पामधून सुमारे ९५ हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे जायकवाडी धरणात सध्या ५६ हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने पाण्याची आवक होत आहे.

****